| MHST130005482009 | नियमित दिवाणी दावा क्र. ५८/२००९<br><br>आनंदा व इतर वि. शंकर व इतर |
|---|---|

## निशाणी क्र. ३८ खालील आदेश

१. प्रतिवादी क्र. १अ ते १क यांचे तर्फे प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १अ ते १क यांनी केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १अ ते १क यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना महत्वाचे कागदपत्रे, उतारे, फेरफार, दस्त वेळेत मिळाले नाहीत तसेच त्यांना त्यांचे घरगुती कामाच्या व्यापामुळे कागदपत्रे उपलब्ध करुन न्यायालयात हजर राहुन वकिलांना वेळेत माहिती देणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध एकतर्फा आदेश पारित करण्यात आला. करिता, प्रतिवादी क्र. १अ ते १क विरुद्ध झालेला 'एकतर्फा आदेश' रद्द करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर वादीने त्यांची हरकत नोंदवुन अर्जातील दिलेले कारण हे योग्य, संयुक्तीक व कायदेशीर नसल्याचे कथन करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तसेच, अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादीवर र.रु.५,०००/- कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दावा कायम व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १अ ते १क यांचे अर्जात नमूद कथन अविश्वासार्ह असल्याचे दिसून येते. परंतू प्रतिवादी क्र. १अ ते १क यांना त्यांची कैफियत देऊन त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळावी व दावा गुणवत्तेवर निकाली काढता यावा, याकरिता, प्रतिवादी क्र. १अ ते १क यांना संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. करिता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १अ ते १क विरुध्द झालेला 'एकतर्फा आदेश' रद्द करण्यात येतो.

**(राजेश मो. लोळगे)**

दिनांक– २९/०८/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण